# प्रभुतरुण

वर्ष ४९ | अंक ६ | मुंबई | डिसेंबर २०१५ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## 'पॅसेज'

—सुहासिनी कीर्तिकर

शीही नावाच्या लेखकाचं प्रसिद्ध पुस्तक आहे 'पॅसेजेस' नावाचं. आयुष्य जसंजसं पुढे सरकत असतं तशी माणसं एका अध्यायातून दुसऱ्या अध्यायात प्रवेश करतात. आयुष्यच कशाला? माझी आई तर सकाळपासून सुरू होणाऱ्या आनंददायी दिवसातली एकेक कामं पार पडली तरीही तिच्या पद्धतीनं म्हणायची, 'एक अध्याय संपला!' म्हणजे असं की सकाळचा स्वैंपाक करून झाल्यावर सगळ्या माणसांनी ते अन्नब्रह्म स्वीकारलं की म्हणायची 'सकाळचा एक अध्याय संपला. आता दुसरा.' किती सहज आणि सुंदर तत्त्वज्ञान आहे हे! अध्याय संपतो; पण पोथी सुरूच रहाते. याच तत्त्वज्ञानाची पुढची पायरी म्हणजे आयुष्य हे जन्म मृत्युपुरतेच मर्यादित नाही. जन्म झाला की माणसाच्या किंवा 'जीवा'च्या एक आधीच्या प्रवासातला दृश्य टप्पा सुरू होऊन जगण्याचा अध्याय सुरू होतो. त्याच 'जीवा'चा मृत्यु झाला की ते तत्त्वज्ञानाच्या प्रान्तात 'मृत्यु' किंवा 'संपणे' नसतेच! त्याचा पुन्हा अदृश्य असा अदृष्टाचा नवीन अध्याय सुरू होतो. प्रवास दृश्यादृश्य पातळीवर कायम सुरूच असतो. म्हणूनच ख्रिस्ती धर्मात माणसाच्या मृत्यूला शोक-आक्रंदन यांचा स्पर्श होत नाही. हा 'पॅसेज' संपवून जीव दुसऱ्या 'महाप्रवासा'ला निघालेला असतो. त्याला संतुलीत मनानं निरोप द्यायचा असतो. स्वामी विवेकानंदांनीही हेच सांगितलं आहे. अलिकडचे 'ओशो'ही मरण म्हणजे एक 'उत्सव' (सेलेब्रेशन) मानतात. महर्षी अण्णासाहेब कर्वेही आपल्या शंभरीनंतरच्या वयात याच जाणीवेने कार्यउर्जा राखून होते; आणि आपल्या जगण्यातून, कार्यातून 'पुन्हा नवी जन्मेन मी' म्हणणारे कलावंत, साहित्यिकही हा मरण नावाचा आनंददायी सोहळा आपल्या कलाकृतीतून समरसून पहातात तो याच जाणीवेने.

किती सुंदर असेल जन्ममृत्यूच्या दृश्य टप्प्यानंतरही सतत सुरू राहाणारा प्रवास. फक्त एकच. असे मृत्यूनंतरच्या 'पॅसेज'मध्ये शिरताना आपल्या सहप्रवाशांचे, सोबत्यांचे धरलेले बोट अटळपणे सोडावे लागते. लागतेच. या बाबतीत अगदी 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हेच खरे. तुम्ही म्हणाल, ''यावेळी 'प्रभुतरुणा'च्या संपादकीयात हा काय नवीन अध्याय सुरू झाला?'' काळ सरकत असताना अधेमधे असाही अध्याय येतोच. थोडा वेगळा प्रवास लेखणीलाही करावासा वाटतो. विचारांचा, चिंतनाचा. सावरण्यासाठी, आयुष्याला नव्या उमेदीने भिडण्यासाठी आवश्यकच असतं ते.

'पॅसेजेस'ची वाचनस्मृती 'रीवाईंड' झाली मित्रहो, ती अलीकडे श्री. शाम जयकर यांच्या जाण्यानं. दर महिन्याला 'प्रभुतरूण' त्यांच्या घरी गेला की दूरध्वनीवरून त्यांचे बोलणे माझ्या घरी यायचे. माझ्या प्रत्येक; अगदी प्रत्येक लेखाला त्यांची मनापासून दाद मिळायची. एकेका शब्दावर त्यांची मल्लीनाथी असायची, स्वत:च्या आठवणींना उजाळा देत ते कधी माहिती सांगायचे; तर कधी गमती. मी माहेरहूनही पाठारे प्रभूच आहे याचा त्यांना सुरुवातीला पत्ता नव्हता. तो लागल्यावर मग टेलिफोनवरील संवादात मी न चुकता म्हणायचे, 'मी परभीण बोलतेय.' ते छाऽऽन हसून दाद द्यायचे त्यावर. शामचे हसणे छाऽऽनच असायचे. कारण तो त्यांचा जगण्याचा धर्म होता. खरेतर त्यांचे मूळ नाव शामराव. पण सिद्धार्थ महाविद्यालयात शिकत असताना त्यांचे मराठीचे प्राध्यापक अनंत काणेकर त्यांना म्हणाले, ''अरे, एवढासा तू. शामराव असे प्रौढ नाव कशाला? नुसतं 'शाम' असंच लाव तू नाव'' झालं. शामराव नावाच्या तरुणालाही ते रुचलं. तेव्हापासून ते 'शाम' झाले. हो! अन् आयुष्यभर 'तरुण'ही राहिले. ज्ञातीतील कुठलाही कार्यक्रम असो; शाम जयकर हजर. नुसते हजर नाही; तर श्रोता म्हणून सर्वात पुढे बसणार. वक्ता म्हणून सहभागी होणार. कलाकार म्हणून प्रकाशरेखेच्या पलीकडे रंगमंचावर स्वत:चा अभिनय प्रकाशमय करणार. संवादात चुरचुरीत विनोदाची पखरण करणार. शब्दांची, रसिकतेची दाद देणार. जणू काही या माणसाने जगण्याचाच आनंदोत्सव केला होता. मला आठवतेय, 'प्रभुतरुणा'चे व्यंगचित्रकार प्रदीप कोठारे यांनी या विषयावर अतिशय सार्थपणे एक चित्र सादर केले होते. 'हास्यरेखा'मध्ये महिला समाजाचा रासगरबा कार्यक्रम चालू आहे; असा प्रसंग. त्या सामूहिक आनंद लुटण्याच्या नृत्यात नाचणाऱ्यांच्या घोळक्यातून हातातील एक काठी उंच अशी उभारलेली दिसत आहे. न सांगताही चित्र पाहून कळत होते की ही काठी कुणाची आहे. आनंदाची ध्वजाच अशी फडकणारी ती उंचावलेली काठी आणखी कोणाची असणार? तीन पाय वापरावे लागले म्हणून काय नाच करायचा नाही? आनंदात सामील व्हायचे नाही? शाम जयकरांना ते कधीच जमले नाही. ते सतत आनंद लुटत राहिले, वाटत राहिले.

आनंद वाटण्याचा या सदाबहार 'शामदादा'चा आणखी एक मार्ग होता. चॉकलेट (कॅडबरी) ते खिशातच ठेवत. कुणाचं अभिनंदन करायचं आहे, कुणाला शाबासकी द्यायची आहे; तर संस्था रीतसर देतीलच; पण शाम जयकर छोटंसं कॅडबरी देणार. अगदी हसण्यानं न्हाऊन निघालेल्या चेहऱ्यानं. म्हणूनच त्यांच्या पंच्याहत्तरी निमित्ताने 'प्रभुतरुणा'च्या संपादकीयात त्यावेळचे संपादक श्री. विहंग नायक यांनी त्यांच्यावर लेख लिहिला तेव्हा त्याचं शीर्षकच होतं- 'चॉकलेट शाम ए गझल'! 'शाम ए गझल'च होती ही जगण्याच्या वृत्तीची. 'प्रभुतरुणा'च्या प्रत्येक वाढदिवसाला वृंदा आणि शाम यांच्याकडून न चुकता चॉकलेटचा केक येतो. पहा; शाम गेले तरी मी 'येतो' असे वर्तमानकाळीच लिहून जातेय! या केकबरोबर प्रभुतरुणाच्या वाढदिवस वर्षानुसार तितके रुपये भेट. म्हणजे प्रभुतरुण ७५ वर्षांचा झाला तर ७५ रु., ९० वर्षांचा झाला तर ९० रुपये... या पद्धतीने. याचवर्षी ही प्रथा मोडून त्यांनी एक हजार एक रुपयांची भेट दिली. ही भेट चांगलीच. पण आधीच्या पद्धतीत 'प्रभुतरुणा'चं वाढणं वर्षांच्या हिशोबानं त्यांच्या गणतीत होतं. 'तरुणा'च्या वाढदिवसाला ते उत्स्फूर्तपणे एखादा विनोदही सांगत, किंवा विनोदी भाष्य करीत. 'हसत रहा, हसवत रहा' असा मंत्र असे त्यात. कधी कधी तो बालीश असे, पण त्यामागील भावना मात्र प्रौढ. 'प्रभुतरुणा'च्या एका कार्यक्रमात (फार पूर्वी, पार्ल्याच्या लोकमान्य सेवासंघात झाला होता तो कार्यक्रम) त्यांनी विनोदी कथाकथनही केलेलं आठवतेय मला. गच्चीवरून उतरून चोर आले आणि त्यांनी काय काय पराक्रम केले - त्याची गंमतगोष्ट त्या कथेत होती. नंतर कळलं की ती प्रत्यक्षात घडलेली खरीच कथा होती. म्हणजे पहा, खऱ्या घडलेल्या घटनेतही त्यांनी मजा लुटली. हीच त्यांची वृत्ती होती. दुसऱ्याला मदत करण्यातही ते तत्पर असत.

मागे एकदा 'पाठारे प्रभु ज्ञाती' या विषयावर आधारीत माझी आकाशवाणीवर चांगली पन्नास मिनिटे अशी अपवादात्मक मुलाखत होती. तेव्हाची गोष्ट. अपेक्षेप्रमाणे ही बातमी लागताच शाम जयकरांचा या 'परभिणी'ला फोन आला. ज्ञातीविषयी कितीतरी माहिती त्यांनी आपणहून दिली. कितीतरी अभिमानास्पद घटना सांगीतल्या. इतकेच नव्हे तर; 'हुंडा' नाटकातील पार्टीचे गाणेही अगदी तालासुरावर ऐकवले. शेवटी म्हणाले, 'प्रत्येक बाबतीत आनंद लुटणारी आपली जात आहे. सगळ्या सगळ्या जातींचे सणवार आपण आपले म्हणून करतो. लहानसहान बाबतीतही

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)

मोठ्या पार्ट्या करतो, आनंद लुटतो. हे सारे तुम्ही सांगाच मुलाखतीत.' मी मनात म्हटलं तेव्हा - 'अगदी खरंय. त्याचं साक्षात् उदाहरण म्हणजे तुम्हीच आहात शामराव.' अर्थात त्यांच्या या उत्साही, आनंदी स्वभावाला मुक्त; तरीही जबाबदार साथ मिळाली ती वृंदाताईंची. 'शामवृंदा' किंवा 'वृंदाशाम' - कसंही उच्चारा. एकच अद्वैती भावना त्यातून व्यक्त. (म्हणजे आपली कोडी असतात ना - शब्द सुरुवातीपासून म्हणा; वा शेवटापासून अक्षरे तीच असतात उदा. 'डालडा' किंवा 'रामाला भाला मारा' वगैरे. अगदी तस्संच. शामवृंदा म्हणा, वृंदाशाम म्हणा अर्थ तोच.) म्हणूनच वृंदाताईंच्या पंच्याहत्तरीला चाकांच्या खुर्चीत बसवून शामना आणलं; तर ते आपलाच वाढदिवस असल्याप्रमाणे दोन्ही हात हवेत उंचावून ''प्रौढत्वी शैशवास' जपत, हसतमुखानं सगळ्यांचं लक्ष वेधून घेते झाले. मुद्दामहून नव्हे; ती त्यांची निरागस खासियतच होती.

ते 'प्रभु प्रभात'बोर्डाचे अधिकृत अध्यक्ष होते. अगदी शेवटपर्यंत. पण 'प्रभु तरुणा'बद्दल प्रचंड बंधुभाव त्यांच्या मनात अखंड झरत होता. इतका की काही वेळा 'मी तू पणाची झाली बोळवण' अशी अवस्था त्यांची होत असे. पाठारे प्रभु चॅरिटीजतर्फे श्री. वीरपाल राणे यांचा सन्मानसोहळा होता. त्यावेळी सहजभावाने श्री. शाम जयकरही बोलले. बोलताना अगदी नकळतपणे म्हणाले, 'मी वीरपाल राणेंना 'प्रभुतरुणा'तर्फे शुभेच्छा देतो.' विहंग नायकांसह सर्वांनी हसून दाद दिल्यानंतर मग त्यांनी बोलण्यातील चूक सुधारली. 'प्रभुप्रभाततर्फे शुभेच्छा देतो' म्हणाले ते. बोलण्यातली चूक असेल अनवधानाने. पण का? तर त्यांच्या मनीमानसी 'प्रभुतरुण' बद्दलची आपलेपणाची भावना होती म्हणून ना? म्हणूनच इथे त्यांच्यावर लिहीताना मी 'प्रभुप्रभात'च्या अध्यक्षांविषयी आणि 'प्रभुतरुणा'च्या आप्तांबद्दल माझी कृतज्ञ भावना व्यक्त करते. शामरावांनी मला फोनवरल्या गप्पांतून माहिती दिली, बातम्या दिल्या, मुख्य म्हणजे जगण्यातला आनंद दिला. या आनंदात त्यांच्या पत्नी वृंदाताईंनीही भर घातली आहे. त्यांची मुलगी सौ. निकेता ही आमची 'अतिथी संपादक'ही होती. एक कुटुंब ज्ञातीसंस्थांविषयी आपुलकी राखून कसं निरामय, निखळ आनंदाचं जीवन जगतं; त्याचं हे मूर्तिमंत उदाहरणच.

आता शाम जयकर आपला 'पॅसेज' ओलांडून वेगळ्या प्रवासाचे यात्रेकरू झाले आहेत. चांगले पती, चांगले वडील, चांगले आजोबा आदी सगळ्या भूमिका चांगल्या जगून झाल्यावर एक वेगळीच भूमिका त्यांच्या वाट्याला आली आहे. एकांड्या वाटसरूची. या वाटसरूला त्यांच्या कुटुंबीयांच्या भावनांची सोबत असणारच. प्रश्नच नाही. त्या बरोबरीने सोबत असेल ती आमच्या (की आपल्या?) सदीच्छांची. मैत्र राखणाऱ्या आमच्या आनंदभावनेची.

तेव्हा, शामराव; शुभास्ते पंथानः।

*

## पाठारे चॅरिटीज

दिनांक १-११-१५ रोजी ठाकुरद्वार येथील चॅरिटीजच्या सुरेश विठ्ठल सभागृहात दीपावलीनिमित्त गरजू ज्ञातीबांधवांना दिवाळी भेटीचे वाटप झाले. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांनी या भेटीचे स्वरूप प्रास्ताविकात सांगीतले. एकूण १७ जणांना याचा लाभ झाला. गरजू भगिनींना लुगडी वाटप करण्यात आले. दरवर्षी होणाऱ्या या समारंभाला ज्ञातीतील निमंत्रित मान्यवर आपुलकीने उपस्थित होते. यावर्षीचे खास वैशिष्ट्य म्हणजे या वर्षी होणाऱ्या विद्याभूषण मानकऱ्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी असणारे प्रमुख पाहुणे डॉ. राहुल राजेन्द्र नवलकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. अमिता राहुल नवलकर निमंत्रित म्हणून उपस्थित होते. डॉ. राहुल यांनी चॅरिटीजच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करीत विचार मांडले. सर्व उपस्थितांसवे स्नेहभोजनही होते. या भोजनापूर्वी विश्वस्त श्री अजित विजयकर, विश्वस्त श्री. राजन जयकर आणि प्रभुतरुणाच्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी या दिवाळी उपक्रमाची वाखाणणी केली.

## हौशी कला मंदिरचे दिवाळी संमेलन

दिनांक १४-११-१५ रोजी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात 'हौशी कला'चे दिवाळी संमेलन पार पडले. याप्रसंगी श्री. आलोक विनोद प्रधान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांचा आणि सौ. ऐशाना आलोक प्रधान यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे आलोकचे वडील श्री. विनोद प्रधान यांनाही प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानित करण्यात आले.

यावेळी 'सर्किट हाऊस' या नाटकाचा प्रयोग सादर झाला. दरवर्षीप्रमाणे त्यानंतर गंमत आणणारा 'लकी ड्रॉ'चा कार्यक्रम झाला. गिरगावपर्यंत आणि अंधेरीपर्यंत याही वर्षी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. श्री. अतुल जयकर, श्री. नरेन्द्र धुरंधर, आदींनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला होता.

## पाठारे प्रभु सोशल समाज

श्री. तुषार कीर्तिकर, श्री अमोघ कीर्तिकर आणि श्री. उमेश कीर्तिकर हे कनकाई देवी संस्थेचे मानयीय विश्वस्त आहेत. गुजराती बांधवांनी उभारलेल्या या ट्रस्टमध्ये हे आपले ज्ञातीय विश्वस्त गेली अनेक वर्षे सेवाभावाने कार्यरत आहेत. कीर्तिकर कुटुंबीयांची कनकाई ही कुलदेवी. या ट्रस्टतर्फे नवरात्रोत्सव साजरा होतो. विलेपार्ले येथील राजपुरिया हॉलमध्ये अतिशय भक्तिभावाने हा उत्सव होतो. श्री. तुषार कीर्तिकर हे पाठारे प्रभु सोशल समाजाच्या कार्यकारिणीवर निवडून आल्यावर त्यांनी समाजाला ज्ञातीबाहेर कलाविष्काराची संधी दिली. अशा संधीचे हे तिसरे वर्ष. मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे; हे समाजाला सांगायला नकोच. श्रीम. स्वाती राणे या समाजाच्या अध्यक्षा. सक्षम अशा. त्यांनी अतिशय उत्तम असे सूत्रसंचालन करीत दिनांक १६-१०-१५ रोजी या उत्सवासाठी जमलेल्या मराठी, गुजराती भक्तगणांना आनंद वाटेल असा कार्यक्रम सादर केला. नृत्यगायन असा हा संमिश्र कार्यक्रम. हा देवीचा उत्सव आहे याचे भान ठेवून भक्तिगीते आणि भक्तिभावपूर्ण नृत्य सादर झाले. नृत्यदिग्दर्शन सौ. मयुरा गुंजारव नायक यांचे होते. विशेष म्हणजे या विविध नृत्यांत यथार्थ मंदार कोठारे, वरुण राकेश राणे, राहिल रितेश कीर्तिकर, प्रणाली राकेश राणे, विवान श्रीपाद आगासकर अशी बाल कलाकार मंडळीही सामील झाली होती. मोइशा अनुरेश कोठारे, जान्हवी रितेश कीर्तिकर, मिहीका मिथील नवलकर, दर्शना किरण जयकर, पल्लवी परेश कोठारे, नीता मिलिंद सेंजित, अश्विका विवेक विजयकर, मयुरा गुंजारव नायक, अपर्णा अनुरेश कोठारे, ऐश्वर्या तेज वेलकर, रोनिका सचिन विजयकर, वैदेही राकेश राणे, निवेदिता धैर्यवान सत्तूर या कलाकारांनी बहार आणली. भक्ती संगीत सादर करून गायकांनीही त्यात भर घातली. क्षमा कोठारे, वीणा अजिंक्य, स्नेहा राणे, रोनिका विजयकर, योगिता नवलकर, सुहासिनी विजयकर, डॉ. वैजयंती अजिंक्य, अक्षदा तळपदे, मधु धुरंधर या मंडळींनी आपल्या स्वरांनी देवीला प्रसन्न केले. क्षमा कोठारे यांनी शेवटी गाईलेल्या भैरवीने भारावून जाऊन कनकाईदेवी ट्रस्टच्या एका भक्ताने उत्स्फूर्तपणे खास बक्षिस जाहीर केले. याला म्हणतात दाद. साथसंगतही सुरेख होती. तबल्यावर होते प्रदीप राणे आणि अवधूत चौबळ. संवादिनीवर सुरांची किमया करायला होते श्री. चंद्रकांत सुतार आणि वसंत मोरे. सहभागी सर्व कलाकारांना कनकाई ट्रस्टतर्फे भेटवस्तू देण्यात आलीच. शिवाय विश्वस्त श्री. तुषार कीर्तिकर आणि सहभागी कलाकार सौ. योगिता नवलकर यांच्यातर्फेही भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ज्ञातीविश्वस्तांच्या 'सौभाग्यवती' सुजाता, सुप्रिया आणि अनघा यांचे विशेष सहकार्य लाभले. असा हा रंगलेला कार्यक्रम इजा, बीजा, तीजा झाला. पुढील वर्षीही तस्साच होवो.

दिनांक २९-११-१५ रोजी खारच्या पा. प्र. ज्ञातीच्या सांस्कृतिक सभागृहात सोशल समाजाचे दिवाळी संमेलन साजरे झाले. या संमेलनाचे अध्यक्ष होते श्री किरण आर तळपदे. न्यूझिलंडला त्यांचे वास्तव्य असते. तेथे ते गुजराती बांधव आणि मराठी तरुणांसोबत समाजकार्य करीत असतात. त्या कार्याची ओळख त्यांनी आपल्या भाषणात करून दिली. मंदिर हेच एक व्यासपीठ असते अशावेळी. अशा मंदिरात जाऊन ते सेवाभावी काम करतात. आपल्या स्टेटबँकेच्या उच्चपदाची धुरा वाहताना त्यांनी रमण देसाई, आत्माराम कोठारे आदी ज्ञातीय आठ मंडळींना उच्चपदीय समितीमध्ये सामावून घेतले. त्याबद्दलची भूमिका त्यांनी मांडली. सोशल समाजाला भरघोस देणगीही त्यांनी दिली. त्यांचा यथोचित परिचय समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी करून दिला. त्या आधी आपल्या प्रास्ताविकात त्यांनी बी.के. धुरंधर पदकासाठी मिळालेल्या अर्थ सहाय्याचा उल्लेख करून दात्यांना आवाहन केले. कै. रा.ग. विजयकर स्मृतिपारितोषिकासाठी आलेल्या भरघोस देणगीबद्दल माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांना उचित भेट त्यांच्याहस्ते दिली गेली. त्यांच्या पत्नी सौ. कुंदा तळपदेंचाही सत्कार केला गेला. या प्रसंगी आलेल्या देणग्यांचे वाचन कार्यवाह श्री. जयंत कीर्तिकरांनी केले. संस्थेच्या उपाध्यक्ष स्वाती जयकर यांनी आभार मानले; तर सूत्रसंचालन नीता सेंजित यांचे होते. यानंतर ऑक्रेस्ट्राचा कार्यक्रम रसिकांचे मनोरंजन करून गेला. डॉ. प्रतिभा, केदार आदी गायकांनी जुन्या गाण्यांना उजाळा दिला. त्यामुळे सोशल समाजाचा दीपोत्सव उजळून निघाला.

लेखांक-११

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

सर्व वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन, प्रभु-तरुणाचा खुमासदार दिवाळी अंक वाचून आपण सारे तृप्त झालो आहोत. सणाला आपले वित्तीय व्यवस्थापन चांगले हवे. फायनान्स आणि त्याचे योग्य नियंत्रण करणे हे फार महत्त्वाचे असते. बँका यासाठी आपली सदैव मदत करत असतात. आपल्या संपत्तीचे व्यवस्थापन आपण नीट केले पाहिजे. आपल्या भविष्यातील वेगवेगळ्या उद्दिष्टपूर्तीसाठी असलेली पैशाची गरज व्यवस्थित भागणे, भविष्यात पैशाची चिंता न राहणे व समाधानात आयुष्य घालवता येणे यासारखे दुसरे सुख नाही.

आज आपण पाहतो की महागाई दिवसेंदिवस वाढतच आहे. भाज्यांचे, डाळींचे भाव, मटणमासळी काही म्हणता काही स्वस्त नाही. शिवाय सरकारचे निरनिराळे कर. आताचा स्वच्छतेसाठी म्हणून अधिक तरतूद करायला विक्रीकर १४.५ टक्क्यांवर आला. या सर्वांतून तावून-सुलाखून जेव्हा आपण बचत (शिल्लक) करतो, ती सुरक्षित असणे, त्यातून योग्य ते उत्पन्न मिळणे, त्या उत्पन्नावर देखील जास्त कर न लागणे हे गरजेचे आहे. किंबहुना आपली तशी विचारसरणी असते. गुंतवणुकीचे अनेक पर्याय आहेत. उदा. घर, जमीन, सोने, चांदी, विविध आर्थिक संस्थेचे निधी शेअर्स आणि म्युच्युअल फंड, बँकांच्या मुदत बंद ठेवी, विमा. आपल्या बचतीच्या रकमेनुसार आपण त्यातून हे पर्याय निवडतो.

आजकाल आपण बँकांच्या जाहिराती पाहतो. 'थ्री ईन वन'' म्हणजे नेमके काय? आपण बचत खाते उघडा. त्यातून डिमॅट खाते चालवा व आपल्या शेअर्स गुंतवणुकीचे ट्रेडींग आमच्याकडून करा. या तिन्ही गोष्टी तुम्हाला आपल्या बँकेच्या शाखेमार्फत करता येतील.

बँकेत गेल्यावर पूर्वी मुदतबंद ठेवीचा फॉर्म पुढे केला जायचा. आता आपणास इतरही गुंतवणुकीचे फॉर्म बंका देतात. उदा. म्युच्युअल फंडात गुंतवणुकीचा फॉर्म, या फंडाद्वारे आपण शेअर्समध्ये पैसे गुंतवू शकतो. पण यात देखील इक्विटी ओरिएन्टेड फंड व डेट फंड असे प्रकार असतात. शेअर्समधील गुंतवणुकीमध्ये जास्त जोखीम आहे. आणि त्यावरील उत्पन्नसुद्धा बँकांच्या मुदत ठेवीवरील व्याजापेक्षा निश्चितच जास्त असते. पण म्हणतात ना जेवढी जोखीम जास्त तेवढे उत्पन्न जास्त मिळण्याची आशा असते. शेअर्सच्या गुंतवणुकीवर लाभांश व भांडवली नफा दोन्हीही मिळते. पण या सर्व उत्पन्नांवर कर किती भरावा लागतो, कोठे कर भरावा लागत नाही याची सर्व माहिती आपण कोठल्याही प्रकारच्या म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना बँकेला अथवा आपल्या एजंटला नीट विचारून घेतली पाहिजे. जाहिरातीच्या प्रलोभलांना बळी पडू नये. क्रिसिल इक्रा किंवा केअर सारख्या पतमापन संस्थांनी दिलेल्या ट्रिपल ए (एएए) किंवा डबल ए (एए) या श्रेणी बघूनच बँकेतर वित्तीय कंपन्या किंवा गृहवित्त साहाय्य कंपन्यांच्या ठेवी निवडाव्यात. या श्रेणी व्याज आणि मुद्दलाची परतफेड वेळेवर करणाऱ्या कंपन्यांची क्षमता दर्शवितात. म्युच्युअल फंडातील गुंतवणूक दीर्घ काळात म्हणजे चार पाच वर्षानंतर लाभदायक ठरू शकते.

आपण बँकेत कसे रिकरिंग डिपॉझिट उघडतो व दर महिन्याला ठरविलेली रक्कम भरतो तद्वत वर्षामध्ये शेअर्समध्ये कधी गुंतवणूक करावी ते शिस्तबद्ध व नियोजनबद्ध ठरवले पाहिजे.

अजून एक गुंतवणुकीचे दालन म्हणजे भविष्य निर्वाह निधी (प्रॉव्हिडंट फंड). नोकरी करणाऱ्याच्या पगारांतून या निधीमध्ये नोकरदार व मालक यांच्याकडून ठराविक रक्कम या निधीत जमा केली जाते. या निधीवर ९.५ टक्के व्याज मिळते. परंतु जे नोकरी न करता व्यवसाय करतात त्यांना सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीमध्ये गुंतवणूक करता येते. यात नोकरी करणाऱ्यांनाही गुंतवणूक जमा करता येते. यावर मिळणारे व्याज करमुक्त असते. आपण आपल्या मुलांच्या नावेही या खात्यात पैसे जमा करू शकतो. पण दीड लाखाच्या वर रक्कम जमा करता येत नाही.

बँका आपल्याला जीवन विम्यामध्येदेखील गुंतवणूक करण्याचे फॉर्म देतात. यामध्ये संरक्षणाचा मुद्दा हा बचतीपेक्षा महत्त्वाचा असतो. विम्याचेही खूप प्रकार आहेत. मुलांसाठी, पती-पत्नींसाठी, एन्डोमेंट, संपूर्ण हयातीची (होल लाईफ), मनीबॅक पॉलिसी काढण्यापूर्वी त्याचे नियम व अटी नीट समजून घेणे फार महत्त्वाचे असते. या विम्यापासून होणारे संरक्षण, गरज लागल्यास त्या पॉलिसीवर मिळणारे कर्ज, आपणास भरावे लागणारे वार्षिक हप्ते या साऱ्यांचा नीट विचार करूनच आपण विम्याची पॉलिसी निवडली पाहिजे.

आपण पाहतो दिवसेंदिवस वैद्यकीय उपचार महाग होत चाललेत. शिवाय आजारपण, अपघात काही सांगून येत नाही. त्यामुळे वैद्यकीय विमा म्हणजे 'मेडिक्लेम' पॉलिसी देखील काढली पाहिजे. आरोग्य विमा उतरवणे ही सर्वात प्रदीर्घ काळाची आवश्यक गुंतवणूक ठरते. आपले उत्पन्न, आजारांची शक्यता, पॉलिसीचा हप्ता या साऱ्यांचा विचार करून योग्य त्या रकमेची पॉलिसी काढावी.

तेव्हा मंडळी; घाबरू नका. भाविष्यकाळ आनंदात घालवण्यास थोडी-थोडी तरतूद करत राहा. गुंतवणुकीच्या वर नमूद केलेल्या पर्यायाचा नीट विचार करून आपणास आपल्यावरील जोखीम, आपले उत्पन्न व शिल्लक आपणास भरावे लागणारे कर या साऱ्यांचा विचार करून गुंतवणूक करा. मात्र कोठल्याही गुंतवणुकीला नामनिर्देशन करायला विसरू नका हं!

(समाप्त) ✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

सोशल समाज आणि पा. प्र. को. ऑप. हा. सोसायटी, खार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७-१-१६ रोजी खार येथील सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात दुपारी ३ वाजता खालील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१) **रांगोळी स्पर्धा** (वेळ १ तास)

विषय : ख्रिसमस ट्री (१५ वर्षाखालील)
नांगऱ्या (१५ वर्षावरील)

सूचना : खडू, पट्टी, ठिपक्यांचा कागद किंवा कोणतेही चित्र सोबत नसावे.

२) **चित्रकला स्पर्धा** ( वेळ ३० मिनिटे)

अ गट - ५ ते ८ वर्षे - विषय - जोकर
ब गट - ९ ते १५ वर्षे - विषय - सर्कस
क गट - १५ वर्षावरील - विषय - संक्रांत

सूचना : कागद पुरविला जाईल. रंग ज्याचे त्यांनी आणावेत.

३) **हस्तकला स्पर्धा** (वेळ ३० मिनिटे)

अ गट - ५ ते ८ वर्षे - कार्ड पेपरचा रंगीत मासा बनविणे.

सूचना - फक्त कार्डपेपर पुरविण्यात येईल.

ब गट - ९ ते १५ वर्ष - विषय - पेन्सिल शेवपासून फुले तयार करणे (किमान ५)

क गट - १५ वर्षावरील - विषय - कार्डबोर्डचा ट्रे तयार करून सजविणे.

सूचना - फक्त कार्डबोर्ड पुरविण्यात येईल. सजावटीचे साहित्य ज्याचे त्याने आणावे

४) **संगीत स्पर्धा** -

अ गट - ५ ते ८ वर्षे - विषय - साभिनय कविता सादर करणे (ॲक्शन साँग)
ब गट - ९ ते १५ वर्षे - विषय - चित्रपटगीत
क गट - १५ वर्षावरील - विषय - गझल

सूचना - साथसंगत उपलब्ध असेल.

५) **फॅन्सी ड्रेस स्पर्धा** - ( वेळ ३ मिनिटे)

अ गट - ५ ते ८ वर्षे
ब गट - ९ ते १५ वर्षे
क गट - १५ वर्षावरील

६) **एकपात्री अभिनय स्पर्धा** (वेळ ५ मिनिटे)

अ गट - ५ ते ८ वर्षे - विषय - गोष्ट सांगणे
ब गट - ९ ते १५ वर्षे - विषय - एकपात्री अभिनय
क गट - १५ वर्षावरील विषय - मराठी टी.व्ही. मालिकेतील कोणतीही व्यक्तिरेखा

अधिक माहितीसाठी चिटणींसाशी संपर्क साधावा

चिटणीस - सौ. नीता मिलिंद सेंजित - ९८२०१६६६२८

श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर - ९८६७९५८५३५

✳

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# THE UNVEILING OF THE PORTRAIT OF RT. HON'BLE DR. M.R. JAYAKAR on 20th November 2015 in the Bombay High Court

**-by Adv. Mrs. Ketaki Rajan Jayakar**



It was a very proud moment for all the Pathare Prabhus when the oil painting of Rt. Hon'ble Dr. M.R. Jayakar done by late Mr. Keshavrao Rane was unveiled in the Bombay High Court at the hands of the Hon'ble Acting Chief Justice of Bombay Mrs. Vijaya Kapse Tahilramani. Pandit Sujan Rane who had preserved the portrait made by his father since 1932 handed it over to Rajan this summer with a request to have it adorn the walls of a great legal institution. Thereafter Rajan initially offered it to our Supreme Court, since M.R.Jayakar was a Judge of institutions which were comparable to the our Supreme Court before its formation. However our Supreme Court politely declined the offer. Rajan with his passion for preserving history offered it to the Bombay High Court since M.R.Jayakar was practicing in the Bombay High Court. Chief Justice Mohit Shah and other senior Judges of the Bombay High Court who had seen Rajan's endeavour in putting up the Bombay High Court Museum accepted the portrait and agreed to allot Court Room No:24 for putting up the portrait. The present Acting Chief Justice too accepted Rajan's request for a Private function to be held in the ceremonial Central Court Room for unveiling the same. The Central Court Room has been a place where historical trials had taken place, including three sedition trials of Lokmanya Tilak of 1897, 1908 and 1916 where Lokmanya Tilak had conducted his own case and also the Nanavati Trial among other cases..

The function was held in the ceremonial Central Court Room of our High Court presided over by Her ladyship and the portrait was unveiled by the Hon'ble Chief Justice. Mr. Sujan Rane flew down from U.S.A to attend this momentous occasion to see his father's dream come true. Needless to write that Rajan really worked hard to make it a grand success. The Incorporated Law Society was represented by Solicitor Priyahas Jani. The Appellate Side of the High Court was represented by their President Mr. Rajiv Chavan. The Bar Association (Original Side) was represented by their President Dr. Milind Sathe. Mr.Sujan Rane (the donor of the portrait) and Rajan Motiram Jayakar the backbone of this event flanked the Hon'ble the Acting Chief Justice. The Jayakar Library in Pune University, Kirtikar library in the Bombay High Court and all the achievements of the Rt. Hon'ble M.R.Jayakar dazled all the rapt audience as one by one the august speakers on the stage extolled the legal acumen of Rt. Hon'ble M.R.Jayakar.

Mohan Motiram Jayakar anchored the programme with his usual elan and impeccable English language. Ameet Naik proposed the vote of thanks.

Rajan spoke about the life of M.R.Jayakar and pointed out that there are only two instances of persons who were not Judges of the Bombay High Court and their portraits are hung in the Bombay High Court. First one being that of Sir John Peter Grant (1828 – 1830) who was a Judge of the Supreme Court of Bombay which was the predecessor of the High Court of Bombay and the second one is that of the Rt. Hon'ble M.R.Jayakar. Both the portraits are donated to the High Court.

The present generation is not even aware of the great achievements of this great legal luminary Rt. Hon'ble Dr.M.R.Jayakar. Mukundrao Ramrao Jayakar was born on 13.11.1873 in a middle class Parbhu family, however he lost his father at a very tender age and was brought up by his maternal grandfather Vasudeo Jagannath Kirtikar who himself was an eminent Advocate and for a short time even acted as a Judge of the Bombay High Court.

✶ Jayakar did his schooling in Elphinstone High School and graduation in St.Xavier's College in 1895.

✶ Thereafter he did his M.A. in English & Sanskrit from Elphinstone College in 1897.

✶ He decided to start a school which would inculcate spirit of independence, deep thought and burning patriotism as he felt that the institutions created by British were for nurturing bureaucracy by creating Graduates who would be suitable for government jobs. With the help of Vinayak Thakar, S. R. Dharadhar, V. R. Joshi, P. B. Shingane, S. S. Trilokekar, R. S. Navalkar, Solicitor Raghunandan Kothare and Dr. S. B. Nayak he set up Aryan Education Society which ran Aryan High School. The School is still functioning in Girgaum area. Jayakar taught English and Sanskrit in that school.

✶ Jayakar passed his LL.B. exam in 1902 from Government Law School, which functioned from Elphinstone College building and is now called Government law College..

✶ Jayakar left for London in 1903 and since he could not join Oxford University he joined the chamber of Barrister Mark Romer in Gray's Inn To become a barister

✶ On 14.10.1903 Jayakar took law examination in London and was called to the Bar in 1905. His call was moved by Lord Alverston, Chief Justice of England and seconded by Lord Romer, Judge of the Court of Appeal.

✶ In March 1903 M. R. Jayakar returned to Bombay and applied for being admitted as Advocate. His Application was accepted by Chief Justice of Bombay High Court, Sir Lawrence Jenkins on 17.4.1905 and sworn in before the Bench of Chief Justice and Justice Batty.

✶ M. R. Jayakar was considered an expert on Hindu law and Dharmashastra, as Hindu law was not codified at that time.

✶ M.R.Jayakar taught Hindu Law at Govt. Law School in Bombay but resigned in 1912 as a junior Englishman superseded him to the post of Principal.

✶ In 1923 became member of Bombay Legislative Council.

✶ He was a leader of the Swaraj Party for a short time till his resignation in 1925. He was also a member of Hindu Missionary Society.

✶ In 1926 became member of Central Legislative Assembly.

✶ Jayakar had earlier met Barrister Sir Rufus Isaacs in his student days in the chamber of Romer , Sir Issacs later on became Lord Reading, when Jayakar met him in 1931 at the 2nd Round Table Conference in London. Lord Reading was part of the British delegation. In fact in 1930 Jayakar and Tej Bahadur Sapru were involved in the negotiation between and the British Government, since Motilal Nehru and other Congess leaders were imprisoned. These negotiations eventually led to the Gandhi- Irwin Pact in March 1931 whereby Congress leaders were released from prison and they were persuaded by Jayakar and Sapru to attend the Round Table Conference in 1931. Mr. Jayakar was the legal adviser to the Indian Delegation and sat with Mahatma Gandhi, Madan Mohan Malviya and Tej Bahadur Sapru alongwith other delegation members at the round table conference. In London he also met Mrs.Annie Besant, with whom he had close association in later years.

✶ After 32 years of practice and his positive approach to politics he was elevated to the Bench of Federal Court in 1937 by warrant of King George VI. Under the Govt of India Act, 1935. Chief Justice Maurice Gwyer, and the other two Judges were Shah Suleiman (Chief Justice of Allahabad High Court) and Dr. M.R.Jayakar (from the Bombay Bar ) were the first appointees as Judges of the Federal Court which started functioning in 1937.

✶ M.R. Jayakar was conferred an Honorary Doctorate by Oxford University in 1938 upon the recommendation of E. J. Thompson and Marquis of Lothian.

✶ The High point in his career came when Dr. M.R.Jayakar was further elevated in 1939 to the Judicial Committee of Privy Council by Warrant of King George VI. He was one of the seven Indian Judges who were members of the Judicial Committee between 1909 and 1947.

✶ In 1943 he donated his grandfather's library of 3000 Law books to create the Vasudeo Jagannath Kirtikar Library which still exists in the High Court today In Court Room 36 of the Bombay High Court and Rs.25,000 for further augmentation of library.

✶ He was appointed the First Vice Chancellor of Pune University and remained as such between 1948 and 1956.

✶ He donated his bungalow in Pune and a huge library to Pune University. The Jayakar Library still exists in Pune. His bungalow presently houses Film Institute of India.

✶ He was a member of Constituent Assembly.

✶ He passed away on 10th March 1959.

Luckily Rajan was able to contact a few of the family members including Smt.Rekha Anil Vijayakar (the grand daughter-in-law) and Prasanna Gokhale (great grand daughter )among other. Her simple speech telling the audience of the family life of their dear Babasaheb brought such a wonderful warmth to the evening filled with the grandeur of the erudite Vedanta scholar and the member of the Federal Court and Privy Council. The audience got a very realistic peek in the life of a family man who gathered all his family members at seven in the evening to say the evening prayers together and Babasaheb would not sleep without playing for an hour or so on his Sitar. Both Rajan and myself felt very fulfilled that we had done some small service to the memory of late Rt. Hon'ble Dr. M.R.Jayakar who was the father figure and the guiding force in Rajan's father i.e. Solicitor M.V. Jayakar's life.

✳

वडिलांची कीर्ति

# आमचे बाबा, एक आधारवड

## ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर



-बागेश्री परीख
निवृत्त न्यायाधीश
कुटुंब न्यायालय

*(दिवाळी अंकातील 'वडिलांची कीर्ति' या सदरात बागेश्रीताई परीख यांनी मुलगी आणि वडील यांच्या संबंधावर अतिशय भावपूर्ण लेख लिहिला. वाचकांना तो आवडला. मात्र त्यात वडिलांच्या कर्तृत्वाची माहिती समाविष्ट नव्हती. म्हणूनच या लेखाद्वारे त्यांच्या कर्तृत्वाची ही उजळणी. -संपादक)*

बाबांच्याबद्दल त्यांच्यांच शब्दात सांगायचं तर कुणाही माणसाचं एकंदर व्यक्तिमत्व हे जन्मजात असू शकत नाही. एखाद्या शिल्पकाराने दगडापासून मूर्ती बनवावी तसं ते व्यक्तिमत्व घडत जातं. शिल्पकाराने मूर्ती बनविणं आणि हे व्यक्तिमत्व घडणं ह्यात थोडा फरक आहे. तो इतकाच की ही व्यक्तिमत्त्वाची मूर्ती संपूर्ण कधीच होत नाही. त्यात कोपरे उडवणं, छिनून त्याला उठाव, सफाई आणणं ही क्रिया सतत चालू असते.

आता प्रश्न आहे, हे व्यक्तिमत्त्व बनविणारे शिल्पकार कोण? ही एक व्यक्ती किंवा एकच वातावरण होऊ शकत नाही. बालपणापासून ते शाळा, कॉलेज, व्यवसाय, राजकारण, समाजकारण ह्या निरनिराळ्या स्तरातून जाताना कळत नकळत ते शिल्प बनत जातं.

बाबांचं म्हणजे श्री. सदाशिवराव आनंदराव धुरंधरांचं पण असंच काहीसं घडत गेलेलं व्यक्तिमत्त्व होतं.

२४ मे १९१५ला मुंबईच्या फणसवाडीत त्यांचा जन्म झाला. वडील श्री. आनंदराव गणपतराव धुरंधर त्यावेळच्या इम्पिरियल बँकेत एजंट होते. जी फक्त ब्रिटिशांची मक्तेदारी होती. वडिलांच्या बऱ्याच ठिकाणी बदल्या होत होत्या. त्यामुळे बाबांचं शिक्षण भरुच, प्रभु सेमिनरी व विल्सन हायस्कूलमध्ये झालं. कॉलेज सेंट झेव्हियर्स व नंतर गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली.

त्यांची आई कमळाबाई, अत्यंत धार्मिक. घरात पूजाअर्चा. ह्या सर्वांचा जरी बाबांवर प्रभाव पडला होता तरीही दगडाच्या देवाला, किंवा बाबा, स्वामी अशांना न मानता, गांधीजी, पंडितजी, जयप्रकाश नारायण ही त्यांची आदरस्थाने झाली आईच्या शिकवणीप्रमाणे. शेवटी, नैतिक मूल्यांचाच विजय होतो ह्याची नोंद त्यांच्या मनात पक्की होती.

एलएलबी झाल्यानंतर १९४१ मध्ये बाबांनी वकिली सुरू केली आणि त्याचबरोबर राजकारणात उडी घेतली. गांधीजींच्या चलेजाव चळवळी (क्वीट इंडिया मुव्हमेंट)मध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

१९४३ मध्ये विलेपार्ले अंधेरी नगरपालिकेवर कौन्सिलर म्हणून त्यांची निवड झाली व १९५० पर्यंत म्हणजे बृहन्मुंबई महापालिका अस्तित्वात येईपर्यंत त्यांनी हे काम अतिशय लक्षपूर्वक व चिकाटीने केले. १९५२ मध्ये ते नगरसेवक म्हणून निवडून आले. १९५७ पर्यंत ते नगरसेवक होते, पण चेअरमन म्हणून त्यांनी विलेपार्ल्यातील जनतेसाठी खूप कामे केली.

सचोटी, एकाग्रता व सहृदयता ह्या त्यांच्या गुणांमुळे ते लोकप्रिय होते. त्याचबरोबर कडक शिस्तीचे व नीतीमूल्ये जपणारे होते. त्यांच्या कारकिर्दीत पूर्व-पश्चिमेला जोडणारा मिलन सबवे अस्तित्वात आला. कोलडोंगरी व गाभेरी भागात पाणी पुरवठ्याचं कामही त्यांनी यशस्वीपणे केलं.

त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र पार्टी स्थापन झाली. माझ्या आठवणीत मृणाल गोरे, मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस असे बरेच समाजवादी आमच्या घरी पायधूळ झाडायचे. अनेक रात्री ह्या सभा चालायच्या.

राजकारण्यांबरोबरच त्यांचे खास मित्र पु. ल. देशपांडे, आमचे देशपांडेकाका आमच्या घरी खूपदा यायचे व खूप गप्पागोष्टी व्हायच्या. पु. ल.नी त्यांचं 'बटाट्याची चाळ' हे पुस्तक त्यांच्या इतर दोन मित्रांबरोबर बाबांना अर्पण केलेलं आहे. त्यांना शास्त्रीय संगीताची खूप आवड होती. विलेपार्ले म्युझिक सर्कल स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

अंधेरी, वांद्रे येथील कोर्टात ते एक प्रसिद्ध फौजदारी वकील म्हणून नावारूपास आले होते. वकिली व्यवसायातले बारकावे, पद्धतशीर अभ्यास व चिकाटी ही त्यांना त्यांचे वरिष्ठ पांडुरंग पाटील ह्यांच्याकडून शिकायला मिळाली.

शब्दांचा चढउतार, योग्य तो हावभाव, वक्तृत्वाचा वापर, भाषा प्रभुत्व, प्रसंगी नाटकीपणा व उत्कृष्ट उलटतपासणीची पद्धत असे अनेक आविष्कार त्यांच्यामध्ये दिसायचे.

बाबा म्हणायचे, ''आयुष्यातल्या बाहेरच्या लढाया जिकण्याकरता घराची, पत्नीची बाजू भक्कम असावी लागते. त्यांच्या व्यवसायातल्या, राजकारणातल्या व सामाजिक कार्यातल्या गौरवास्पद कामगिरीचं एकमेव श्रेय ते नेहमी आमच्या आईला, उमाला द्यायचे.

आमची आई उमा, बी.ए. पदवीधर असूनही स्वतःच्या शिक्षिकेच्या व्यवसायाला मुरड घालून संसाराचा संपूर्ण कारभार नेटाने सांभाळला. तिने कधीही दागिन्यांची, साड्यांची व इतर कुठल्याही गोष्टीची कधी मागणी केली नाही. सासूसासऱ्यांची मात्र खूप सेवा केली.

आम्हा तिघाही भावंडांना बाबांनी व आईने खूप उत्कृष्ट, उच्च शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. शेवटपर्यंत ह्या गोष्टीचा त्यांना खूप अभिमान होता. समाजसेवेचं बाळकडूही त्यांनीच पाजलं. त्यांच्या सचोटीचं, सहृदयतेचं व नीतीमूल्ये जपल्याचं भाग्य व समाधान आम्ही आजही उपभोगीत आहोत.

*

Rt. Hon. Dr. M.R Jayakar's portrait was unveiled in the High Court of Bombay by the Chief Justice Mrs. Kapse- Tahilramani On 20 November, 2015 in the presence of a large gathering consisting of Judges, Lawyers and members of the Pathare Prabhu community. The function was organized at the initiative of Solicitor Mr. Rajan Motiram Jayakar. The portrait had been painted by the well-known artist and Fellow of the J. J. School of Arts, Bombay Mr. Keshavrao Rane in 1932 soon after Dr. Jayakar's return from attending the Roundtable Conference in London in 1931 as a delegate to promote the cause of india's independence. The other important delegates were Mahatma Gandhi, Mohamed Ali Jinnah, Dr. Ambedkar. The priceless portrait was donated by Mr. Keshavrao Rane's son Mr. Sujan Rane who specially flew in to Mumbai to attend the function. The function was indeed a matter of pride specially for Pathare Prabhus since Dr. Jayakar was the first Hindu Judge of the Federal Court at New Delhi, which preceded the current Supreme Court of India at New Delhi. Dr. Jayakar was elevated to the Privy Council in London which was the highest Court of Appeal.

**-Sujan Rane**

## पाठारे प्रभु महिला समाज

बुधवार दिनांक २८-१०-२०१५ रोजी समाजाच्या शिवणवर्गात दिवाळीनिमित्त ज्ञातीतील ११ गरजू भगिनींना प्रत्येकी १०००/- रुपये आणि पाच बुंदीचे लाडू अशी दिवाळी भेट देण्यात आली. या प्रसंगी श्रीम. नीला विनय त्रिलोकेकर यांजकडून रु. १०००/-, सौ. माधुरी उदय कीर्तिकरकडून रु. १०००/-, सौ वर्तिका आशीष कीर्तिकरकडून रु. ५००/-, डॉ. सौ. सुनंदा नितीश किर्तीकरकडून रु. ५००/-, सौ. योगिता चंद्रकीरण नवलकरकडून कै. श्री. चंद्रकान्त आनंदराव नवलकर, कै. सौ. चंद्रसैन्य चन्द्रकान्त नवलकर आणि कै. श्री. रामदत्त धाकलाभाई नायक स्मरणार्थ रु. १०००/-, सौ. शोभा नंदकुमार धैर्यवानकडून कै. श्रीम. लक्ष्मी माधव प्रभाकर स्मरणार्थ रु. १०००/- आणि सौ. निशा राणे जाधवकडून कै. श्री. नंदलाल खंडेराव राणे आणि कै. कु. कुंदा आनंदराव अजिंक्य स्मरणार्थ प्रत्येकी २००/- रु. देण्यात आले. सं. चिटणीस सौ. पल्लवी कोठारे आणि सौ. रश्मा विजयकर तसेच सौ. मेघना राणे, सौ. अक्षदा तळपदे यांनी हा उपक्रम पार पाडला.

३१-१०-२०१५ रोजी पा. प्र. को. ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र सभागृहात समाजाने 'ऋणानुबंध' सोहळा साजरा केला. महिला समाजाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा श्रीम. सुबोध प्रधान यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या सौ. उर्वशी धराधर. त्यांचे स्वागत करण्यात आले. महिला समाजाच्या नवीन कार्यकारिणीचा परिचय चिटणीस सौ. पल्लवी कोठारे यांनी करून दिला. कार्यकारिणीच्या माजी सभासदांना, शताब्दी वर्षासाठी नेमलेल्या समिती सदस्यांना, शताब्दी सोहळ्यात सहकार्य केलेल्या मान्यवरांना स्मृतिचिन्हे देण्यात आली. सर्व उपस्थितांना अल्पोपहारही देण्यात आला. या सोहळ्यानंतर दिपाली केळकर यांचा 'शब्दांच्या गावा जावे' हा उत्तरोत्तर रंगत जाणारा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात त्यांनी श्रोत्यांनाही सहभागी करून घेतले होते. कार्यक्रमाअंती संयुक्त चिटणीस सौ. नूतन कीर्तिकर यांनी देणगी वाचन आणि आभार प्रदर्शन केले. या देणग्यांमध्ये ठळक देणगी होती - कै. कु. सुलोचना शामराव गोरक्षकर, कै. कु. सीमंतीनी वसंतराव गोरक्षकर स्मरणार्थ सौ. विद्या मुकुंद गोरक्षकर यांजकडून

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-११-१५ | सौ. निवेदिता आणि श्री. अन्वय रंजन देसाई, | पुत्र, | वांद्रे |
| २४-११-१५ | सौ. मंजू आणि श्री. सौमित्र प्रज्ञेश वेलकर, | पुत्र, | अंधेरी |

### नारळ साखर दिला

२९-११-१५ कु. नम्रता संजय कोर्तिकर श्री. भूषण कारखानीस (आं.ज्ञा.)

### विवाह रौप्य महोत्सव

१४-१२-१५ सौ. प्रियांका आणि डॉ. परेश विजयसेन नवलकर
०२-०१-१५ सौ. हर्षा आणि नीलेश भालचंद्र कोठारे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १८-११-१५ | श्री. सुनील रमेश त्रिलोकेकर | वय ४८, | माहीम |
| २४-११-१५ | श्री. जयंत आत्माराम देसाई, | वय ९४, | खार |

## प्रभुतरुणास देणगी

✶ कै. श्री. समित रसिक विजयकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पत्नी श्रीम. लुविना आणि पुत्र चि. आर्य यांजकडून रु. ३०००/-

✶ सौ. नीना महेश राव यांजकडून रु. १००१/-

✶ सौ. कुंदा आणि श्री. किरण आर. तळपदे यांजकडून रु. १००१/-

✶ सौ. अक्षदा अजित तळपदे यांजकडून त्यांचे वडील कै. भालचंद्र विनायक कोठारे यांच्या २५व्या पुण्यस्मरणार्थ (४-१२-२०१५)- रु. ५०१/-

✶ श्रीम. वृंदा शाम जयकर यांजकडून रु. ५००/-

✶ सौ. विशाखा नीलेश राणे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ श्री. प्रताप मो. वेलकर यांजकडून त्यांचा नातू श्री. धनंजय अजिंक्य याच्या बढतीबद्दल रु. १०१/-

## प्रभुतरुणास भाऊबीज

✶ श्रीम. सुशीला पांडुरंग कोठारे आणि कु. सुनीता पांडुरंग कोठारे यांजकडून रु. ५०१/-

✶ सौ. जना रविन्द्र नवलकर यांजकडून रु. १०१/-

✶ सौ. प्रिया राजेन्द्र नवलकर यांजकडून रु. १०१/-

✶ डॉ. सौ. अमिता राहुल नवलकर यांजकडून रु. १०१/-

✶ सौ. स्मिता अमोल रणजीत यांजकडून रु. १०१/-

✶ सौ. रिचा गौरव रणजीत यांजकडून रु. १०१/-

✶ सौ. रूपा रवी भोजवानी यांजकडून रु. १०१/-

✳

## परीक्षेतील सुयश

**एमबीबीएस**
डॉ. रोहन परेश नवलकर

**बीएमएम**
सलोनी आल्हाद गोरक्षकर 'ए' ग्रेड
अनीशा प्रसाद कोठारे 'बी' ग्रेड

**बी. फार्म**
**कु. सायली मिलिंद धराधर**, विशेष गुणवत्तेसह प्रथम श्रेणी

**उच्च माध्यमिक परीक्षा**
कु. रुची सौमिल कोठारे ४९५/६००, ७६.१५ टक्के

**एमएस्सी (बायोटेक), गुजरात एम. एस. विद्यापीठ**
अंबुजा प्रदीप नवलकर ७९ टक्के

**आय.टी. द्वितीय वर्ष इंजिनीयरींग पदवी, मुंबई विद्यापीठ**
मिहीर प्रदीप नवलकर ८१.८ टक्के

**डिप्लोमा इन कॉम्प्युटर**
विश्रुत प्रदीप नवलकर ८६ टक्के

✳

## अभिनंदन

✶ 'सोसायटी फॉर इमर्जन्सी मेडिसीन, इंडिया'च्या सल्लागार समितीचे सदस्य म्हणून डॉ. परेश नवलकर यांची नियुक्ती झाली. त्यांनी आणखी एक अतिशय उपयुक्त उपक्रम केला आहे. तो म्हणजे गावकऱ्यांसाठी मोटारसायकलवरील रुग्णवाहिका तयार केली आहे. राष्ट्रीय पातळीवर सदस्य म्हणून नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

✶ 'प्रभुप्रभात' बोर्डाच्या अध्यक्षपदी श्रीम. वृंदा शाम जयकर यांची नियुक्ती झाली.

✶ सध्या रंगभूमीवर गाजत असलेल्या 'टॉस' नाटकात सौ. पूजा अजिंक्य यांची रंगतदार भूमिका आहे.

✶ आमच्या सदर लेखिका डॉ. सौ. सुमन नवलकर यांच्या कथा, कविता विविध आठ दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या.

✶ आमच्या सदर लेखिका सौ. कल्पना सुभाष कोठारे यांचेही विविध दिवाळी अंकात साहित्य प्रसिद्ध झाले. अभिनंदन.

✶ सौ. पूजा यतिन धुरंधर अलाहाबाद बँकेच्या 'सीनियर मॅनेजर' झाल्या.

✶ श्री. धनंजय योगेंद्र अजिंक्य यांची 'फायझर ऑस्ट्रेलिया औषधी कंपनीत कमर्शियल प्लावाद ॲनॅलिटीकल मॅनेजर' या हुद्यावर नेमणूक झाली.

✳

(पान ५ कॉलम ४ वरून)

शैक्षणिक बक्षिसांसाठी रु. २५,०००/- रुपयांची.

✶ महिला समाजातर्फे दरवर्षीप्रमाणे १०-१-१६ रोजी आनंद मेळावा भरविण्यात येणार आहे. या मेळाव्यात आपआपले गाळे घेण्यासाठी इच्छुकांनी समाजाच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा. या मेळाव्याचे उद्‌घाटन निर्माती वैजयंती कुलकर्णी आपटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

✶ दिनांक २९, ३०, ३१ जानेवारी २०१६ रोजी महिला समाजाची सहल दापोली, हर्णे या कोकणातील ठिकाणी जाणार आहे. सहल शुल्क प्रत्येकी रु. ६०००/- फक्त असेल.

अधिक माहितीकरिता खालील व्यक्तींशी कृपया संपर्क साधावा; असे आवाहन करण्यात आले आहे.
सौ. साया नवलकर - ९८२१३००३९९
सौ. पल्लवी कोठारे - ९८६७६४७७९
सौ. नूतन कीर्तिकर - ९६१९१६८१३१
सौ. रश्मा विजयकर - ९८२०९८१८८२
कु. शोभना जयकर - ९८२०५५६८४०
सौ. बिंबा नायक - ९८३३१२१८८४
सौ. नीता सेंजित - ९८२०१६६६२८

✳

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.: ९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता: खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४००००८

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67